C/13


# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)

कुलसचिव दुरध्वनी : ०७२४-२२५८३७२


वाचा : सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. सीईआर-२०२१/प्र.क्र. ६७/३०, दि. ०२ ऑगस्ट, २०२१.

## परिपत्रक

जा.क्र. साप्रवि/स्वातंत्र्यदिन/७४/ १७०१/२०२१ दि. ०६/०८/२०२१

भारतीय स्वांतत्र्य दिनाच्या ७४ व्या वर्धापन दिनानिमित्य रविवार, दि. १५ ऑगस्ट २०२१ रोजी सकाळी ०८.०० वाजता विद्यापीठाच्या प्रशासकीय भवनासमोरच्या प्रांगणात मुख्य कार्यालयीन ध्वजारोहणाचा कार्यक्रम मा.डॉ.विलास भाले, कुलगुरू, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांचे शुभहस्ते संपन्न होणार आहे. याप्रसंगी विद्यापीठातील सर्व कार्यालय प्रमुख/ नियंत्रण अधिकारी, सर्व कर्मचारीवृंद कळविण्यात येते की, वरील कार्यक्रमाप्रसंगी सर्वानी ०७.४५ वाजता मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरच्या प्रांगणात उपस्थित रहावे. संपुर्ण कार्यक्रमाची रूपरेषा सोबत मागील पृष्ठावर दिलेली आहे.

सदर कार्यक्रमात सर्व अधिकारी व कर्मचा-यांनी राष्ट्रीय पोशाख परिधान करून उपस्थित राहावे. सद्यास्थितीत कोरोना (कोव्हीड-१९) विषाणूचा प्रादुर्भाव विचारात घेता सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यक्रमस्थळी मास्क घालून यावे व Social Distancing तसेच कोरोना संदर्भातील शासनाच्या सर्व निर्देश तथा नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

उपरोक्त संदर्भांकित शासन परिपत्रकातील दिशानिर्देशान्वये विद्यापीठ अधिनस्त कृषि विद्यालये/ महाविद्यालये, संशोधन केंद्रे तथा इतर कार्यालये यांनी ध्वजारोहणाचा तथा त्या अनुषंगाने आयोजीत करावयाचे शैक्षणिक तथा इतर कार्यक्रम आपल्या स्तरावर प्राधान्याने आयोजीत करावे.

कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

**प्रतिलीपी :**

१) संचालक (सर्व) ----------------------------------------
२) अधिष्ठाता (सर्व) ----------------------------------------
३) सहयोगी अधिष्ठाता (सर्व) ----------------------------------------
४) वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (सर्व) ----------------------------------------
५) प्रभारी अधिकारी (सर्व) ----------------------------------------
६) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष (ARIS Cell), यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.
७) विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख / नियंत्रण अधिकारी (सर्व) ----------------------------------------
आपणांस विनंती करण्यात येते की, वरिल कार्यक्रमानिमित्त आपण सर्वानी उपस्थित राहावे तसेच सदर परिपत्रक आपले अधिनस्त असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणुन उपरोक्त कार्यक्रमास आर्वजुन उपस्थित राहणेबाबत सुचना देण्यात याव्यात.
८) विद्यापीठ नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / विद्यापीठ ग्रंथपाल/ विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी
९) उपकुलसचिव (आस्थापना/साप्रवि/वि.वि)
१०) सहाय्यक कुलसचिव (आस्थापना/साप्रवि/परिक्षा/समिती/प.शि.सं./कृ.म.वि./उ.वि.म./व.वि.म./कृषि अभि.) ----
११) सहाय्यक नियंत्रक (अंदाजपत्रक/मुख्यालय)/अधिदान व लेखाधिकारी (अकोला व नागपूर)
१२) मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक / तांत्रिक सचिव यांना माहितीकरीता सादर.
१३) सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
१४) ----------------------------------------

*कार्यक्रमाची रूपरेषा मागील पानावर)*

c/15

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७४ वा वर्धापन दिवस

### रविवार, दि. १५ ऑगस्ट, २०२१

### वेळ - सकाळी ०८.०० वाजता

### कार्यक्रमाची रूपरेषा

| अ.क्र. | कार्यक्रमाचे स्वरूप | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १. | कुलसचिव यांचे मा. कुलगुरू महोदय यांचे निवासस्थानी आगमन | सकाळी ०७.४० वा. | मा. कुलगुरू महोदय यांचे निवासस्थान |
| २. | मा. कुलगुरू महोदय यांचे त्यांच्या निवासस्थानावरून प्रस्थान | सकाळी ०७.४५ वा. | मा. कुलगुरू महोदय यांचे निवासस्थान |
| ३. | मा. कुलगुरू महोदय यांचे डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती केंद्र परिसरात आगमन | सकाळी ०७.४८ वा. | स्मृती केंद्र परिसर |
| ४. | डॉ. भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख यांचे पुर्णाकृती पुतळ्याला पुष्पांजली व हारार्पण | सकाळी ०७.५० वा. | स्मृती केंद्र परिसर |
| ५. | मा. कुलगुरू महोदय यांचे मुख्य समारंभाच्या स्थळी आगमन | सकाळी ०७.५५ वा. | मुख्य प्रशासकीय भवनासमोरील प्रांगणात |
| ६. | मा. कुलगुरू महोदय यांचे शुभहस्ते ध्वजारोहण | सकाळी ०८.०० वा. | मुख्य समारंभाच्या नियोजित स्थळी |
| ७. | मा. कुलगुरू महोदय यांचे स्वातंत्र्यदिनाप्रित्यर्थ मार्गदर्शनपर मनोगत | सकाळी ०८.०५ ते ०८.२५ वा. | मुख्य समारंभाच्या नियोजित स्थळी |
| ८. | समारंभाची सांगता | सकाळी ८.३० वा. | |
| ९. | वृक्षारोपण करणे, आंतर शालेय/ आंतर महाविद्यालय यांच्या स्तरावर Online पध्दतीव्दारे वादविवाद स्पर्धा, प्रश्नमंजुषा, देशभक्तीपर निबंध व कविता स्पर्धा, एखाद्या विषयाच्या Webniar आयोजीत करणे, NSS व्दारे देशभक्तीपर मोहिम राबविण्यात यावी. सोशल मीडीया/ Digital माध्यमांव्दारे देशभक्तीपर किंवा राष्ट्रीय एकात्मते संबंधात गाण्यांचा प्रचार करावा/ संदेश द्यावा. | स्वातंत्रदिनाचे दिवशी दिवसभर | संबंधित कृषि विद्यालये, महाविद्यालये, संशोधन केंद्रे तथा इतर कार्यालये यांनी आपले स्तरावर अयोजन |

कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला